| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | आयोगाच्या परीक्षांना कोण अर्ज करु शकते? | (१) संबंधित परीक्षा/पदाच्या जाहिरातीमध्ये/अधिसूचनेमध्ये नमूद केल्यानुसार विहित शैक्षणिक अर्हता/अनुभव/पात्रता धारण करणा-या खालील व्यक्तींना अर्ज करता येईल:-<br>(अ) भारताचा नागरिक किंवा<br>(ब) नेपाळचा प्रजाजन किंवा<br>(क) भूतानचा प्रजाजन किंवा<br>(ड) भारतामध्ये कायमचे स्थायिक होण्याच्या उद्देशाने १ जानेवारी, १९६३ पूर्वी भारतामध्ये आलेला तिबेटी निर्वासित किंवा<br>(ई) भारतामध्ये कायम स्थायिक होण्याच्या उद्देशाने पाकिस्तान, ब्रह्मदेश, श्रीलंका आणि पूर्व आफ्रिकेतील केनिया, युगांडा आणि (पूर्वी टांगानिका व झांजिबार म्हणून ओळखले जाणारे) टांझानियाचे संयुक्त प्रजासत्ताक, झांबिया, झैरे, मालावी, इथियोपिया आणि व्हिएतनाम येथून स्थलांतर करून आलेली मूळची भारतीय असलेली अशी व्यक्ती असली पाहिजे.<br>(२) तथापि, वरील (ब ) ते (ई ) या वर्गातील उमेदवारांजवळ महाराष्ट्र शासनाने त्यांच्या नांवे दिलेले पात्रता प्रमाणपत्र असले पाहिजे. |
| २ | महाराष्ट्राची रहिवासी नसलेली व्यक्ती आयोगाच्या परीक्षा देऊ शकते काय? | खुल्या सर्वसाधारण पदावरील निवडीकरीता महाराष्ट्राची रहिवासी नसलेली व्यक्ती परीक्षा देऊ शकते. |
| ३ | मराठी भाषेचे ज्ञान नसलेली व्यक्ती आयोगाच्या परीक्षा देऊ शकते काय? | मराठी वाचता, लिहिता व बोलता येत असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील. |
| ४ | आयोगाच्या परीक्षांना अर्ज करण्याची पध्दती काय आहे? | (१) आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सर्व आवश्यक तपशीलासह प्रोफाईल तयार करुन संबंधित पद/भरतीकरीता जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर फक्त ऑनलाईन पध्दतीने विहित शुल्कासह अर्ज करता येईल.<br>(२) विहित परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाईन तसेच ऑफलाईन पध्दतीने चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये करता येईल.<br>(३) अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही.<br>(४) सविस्तर सूचनांसाठी आयोगाच्या संकेतस्थळावरील " उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" व संबंधित जाहिरातीचे/अधिसूचनेचे अवलोकन करावे. |
| ५ | आयोगाच्या संकेतस्थळावरील प्रोफाईलचा User Id व / अथवा Password विसरल्यास काय करावे? | User Id / पासवर्ड विसरला असल्यास संकेतस्थळावर दिलेल्या पध्दतीनुसार आवश्यक तपशील भरुन User ID मिळविता येईल व पासवर्ड Reset करता येईल. यासंदर्भात अडचण आल्यास आयोगाकडे नोंद करण्यात आलेला आधार क्रमांक/मोबाईल क्रमांक नमूद करुन नोंदणीकृत ईमेल आयडी वरुन आयोगाच्या sec.mpsc@maharashtra.gov.in या ईमेलवर विनंती अर्ज करावा. |
| ६ | अर्ज सादर करण्यात कोणत्याही कारणाने अडचण आल्यास कोणाशी संपर्क करावा? | तांत्रिक अडचणीसंदर्भात ०२२-६१३१६४०२ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. इतर अडचणींसाठी ०२२-२२७९५९७१ या दूरध्वनीवर किंवा sec.mpsc@maharashtra.gov.in या ईमेलवर संपर्क करता येईल. |
| ७ | परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतरही प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा केला नसल्याचे दिसत असल्यास काय करावे? | (१) ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा यशस्वी झाल्यास, सदर भरणा यशस्वी झाल्याची पावती (Status Paid / भरणा केली) तात्काळ उमेदवाराच्या खात्यामध्ये दिसून येते.<br>(२) ऑनलाईन पद्धतीने शुल्काचा भरणा करतेवेळी प्रक्रिया सुरु असताना, इंटरनेट सेवा, Payment Gate-way मंद असणे, इंटरनेट सेवा मधूनच खंडीत होणे, संगणक बिघडणे, इत्यादी कारणांमुळे काही वेळा शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही. परंतु उमेदवाराच्या बँक खात्यातून रक्कम वजा होते, सदर रक्कम आयोगाच्या खात्यामध्ये पोहोचत नाही व कालांतराने उमेदवाराच्या बँक खात्यामध्ये पुन्हा जमा होते. त्यामुळे ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही करताना उमेदवाराने भरणा यशस्वी झाल्याची पावती (Status Paid / भरणा केली) प्राप्त झाली असल्याची खात्री विहित दिनांकाच्या आत करुन घेणे, तसेच सदर भरणा यशस्वी झाल्यास पावती स्वत:जवळ जतन करुन ठेवणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| ८ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतरही प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा केला नसल्याचे दिसत असल्यास काय करावे? | भरणा केलेल्या चलनाची प्रत, युजर आयडी, आधार क्रमांक व परीक्षेचे / पदाचे नांव यांचा उल्लेख करुन mpsc.support@mahaonline.gov.in या ईमेल वर निवेदनासह पाठवावी. |
| ९ | अर्ज करण्याची विहित मुदत संपल्यानंतर अर्ज सादर करता येऊ शकतो काय? | आयोगाकडून अर्ज स्वीकारण्यास मुदतवाढ दिल्याखेरिज कोणत्याही परिस्थितीत विहित मुदत संपल्यानंतर अर्ज सादर करता येत नाही. |
| १० | विहित मुदतीत अर्ज सादर केला परंतु, परीक्षा शुल्काचा भरणा चलनाद्वारे बँकेत विहित मुदतीनंतर केल्यास अर्ज ग्राह्य धरला जातो काय? | (१) विहित मुदतीत अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणासुध्दा विहित मुदतीत करणे आवश्यक आहे.<br>(२) चलनाद्वारे केला जाणारा परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुस-या दिवशी करणे आवश्यक आहे.<br>(३) तदनंतर परीक्षा शुल्काचा भरणा केल्यास (बँकेने स्वीकृत केला तरी) अर्ज ग्राह्य धरला जाणार नाही. |
| ११ | विहित मुदतीनंतर चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर अर्ज ग्राह्य धरला न गेल्यास परीक्षा शुल्काचा परतावा केला जाईल का? | नाही. |
| १२ | ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतरही प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा केला नसल्याबाबत दिसल्याने चलनाद्वारे परीक्षा शुल्काचा भरणा केल्यामुळे दोनवेळा परीक्षा शुल्क भरले गेल्यास त्याचा परतावा करण्यात येतो काय? | नाही. |
| १३ | अर्ज सादर केल्यानंतर अर्जात केलेल्या दाव्यामध्ये बदल करता येऊ शकतो काय? | अर्ज सादर केल्यानंतर अर्जामधील दाव्यामध्ये कोणताही बदल करता येत नाही. |
| १४ | प्रोफाईलमध्ये Freeze केलेल्या तपशीलात बदल करण्याची पध्दती काय आहे? | Freeze केलेला तपशील हा सामान्यत: न बदलणारा असतो. तथापि, उमेदवाराकडून अनावधानाने सदर तपशील नोंदविला गेल्यास बदल करावयाच्या तपशीलाबाबत समर्थनार्थ पुरावा सादर करुन, युजर आयडी व आधार क्रमांकासह आयोगाच्या sec.mpsc@maharashtra.gov.in या ईमेलवर अथवा आयोगाच्या कार्यालयाच्या पत्त्यावर विनंती अर्ज केल्यास सदर बदल करण्याबाबत आयोगाच्या कार्यालयाकडून प्रकरणपरत्वे गुणवत्तेवर उचित निर्णय घेण्यात येईल. |
| १५ | आयोगाच्या संकेतस्थळावरील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या यादीमध्ये नाव नसलेल्या विद्यापीठामधील उमेदवारांना आयोगाच्या परीक्षांना प्रवेश दिला जातो काय? | विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या विद्यापीठ/अभिमत विद्यापीठ (Deemed University) अथवा विद्यापीठ अनुदान आयोग अथवा AICTE अथवा संबंधित केंद्रिय मान्यता मंडळाची (AICTE, MCI, PCI, BCI, NCTE, etc) मान्यता दिलेल्या स्वायत्त संस्थांमधील शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना आयोगाच्या परीक्षांना प्रवेश दिला जातो. |
| १६ | एखाद्या पदाच्या जाहिरातीतील शैक्षणिक अर्हतेमध्ये नमूद अर्हतेव्यतिरिक्त इतर समतुल्य शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारास संबंधित परीक्षेकरीता अर्ज करता येईल काय? | संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमामध्ये तरतूद असल्यास व तसे संबंधित पदाच्या जाहिरातीत नमूद असल्याच महाराष्ट्र शासनाने समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून मान्य केलेल्या पदवी /पदविका स्वीकारार्ह असतील. |
| १७ | उमेदवाराने धारण केलेली शैक्षणिक अर्हता संबंधित पदाच्या जाहिरातीमध्ये नमूद असूनही उमेदवारास अर्ज करण्यात अडचण येत असल्यास कोणाकडे संपर्क करावा? | आयोगाच्या कार्यालयाच्या पत्त्यावर लेखी अर्ज करुन किंवा आयोगाच्या sec.mpsc@maharashtra.gov.in या ईमेल आयडीवर विनंती अर्ज करता येईल. |
| १८ | पदवीच्या अंतिम वर्षाला असलेल्या व/किंवा टंकलेखन परीक्षा दिली आहे परंतु प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाहीत; असे उमेदवार परीक्षेकरीता अर्ज करु शकतात काय? | पदवीच्या अंतिम वर्षाला असलेल्या व/किंवा टंकलेखन परीक्षा दिली आहे परंतु प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही; असे उमेदवार संबंधित पदाच्या पूर्व परीक्षेकरीता अर्ज करु शकतात. तथापि, मुख्य परीक्षेच्या अर्ज करावयाच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी पदवीच्या अंतिम वर्षाचा निकाल व/किंवा टंकलेखन प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १९ | प्राविण्यप्राप्त खेळाडूसाठी असलेल्या आरक्षणाचा लाभ घेण्याकरीता काय करावे लागेल? | (१) प्राविण्यप्राप्त खेळाडूकरीता असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वीचे सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले क्रीडा प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक आहे.<br>(२) क्रीडा विषयक प्रमाणपत्रे योग्य दर्जाची असल्याबाबत व तो उमेदवार खेळाडूकरीता आरक्षित पदाकरीता पात्र ठरतो काय, याविषयी क्रीडा प्रमाणपत्रे पडताळणीबाबतचा संबंधित विभागीय उपसंचालकांचा अहवाल मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकाचा अथवा तत्पूर्वीचा असणे आवश्यक आहे.<br>(३) सरळसेवा भरतीच्या पदाकरीता अर्ज करणा-या प्राविण्यप्राप्त खेळाडूंची क्रीडा प्रमाणपत्रे व सदर क्रीडा प्रमाणपत्रे संबंधित विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणित केल्याचा अहवाल हे प्रस्तुत पदाकरीता अर्ज करण्याच्या दिनांकाचे किंवा तत्पूर्वीच्या दिनांकाची असणे आवश्यक आहे. |
| २० | उमेदवाराने जिल्हाकेंद्राची निवड केली नसल्यास त्यास कोणत्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश दिला जातो? | जिल्हाकेंद्राची निवड न केल्यास उमेदवारास अर्जात नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यातील जिल्हाकेंद्रावर प्रवेश दिला जातो. तथापि, पत्रव्यवहाराचा पत्ता पुणे जिल्ह्यातील असणा-या व जिल्हा केंद्राची निवड न करणा-या उमेदवारांना पुणे जिल्हाकेंद्रावरील क्षमता पूर्ण झालेली असल्यास नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश दिला जातो. |
| २१ | उमेदवाराने निवडलेले व निवडले नसल्यास आयोगाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेले जिल्हाकेंद्र बदलून मिळू शकते काय? | कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास जिल्हाकेंद्र बदलून दिले जात नाही. |
| २२ | परीक्षेच्या वेळी ओळखीचा पुरावा म्हणून बँक पासबुक, शाळा/महाविद्यालयाचे ओळखपत्र, शासकीय कर्मचारी असल्याचे ओळखपत्र ग्राह्य धरले जाईल काय? | (१) ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किंवा फक्त स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतीही दोन ओळखपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती सोबत आणणे अनिवार्य आहे. याव्यतिरिक्त कोणतेही ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.<br>(२) आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधारवर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह कलर प्रिंटमध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल. |
| २३ | दोन ऐवजी केवळ एकच ओळखपत्र सादर केल्यास परीक्षेस प्रवेश मिळू शकेल काय? | दोन मूळ ओळखपत्रे व त्यांच्या छायांकित प्रती सादर केल्याशिवाय उमेदवारास परीक्षेस प्रवेश मिळू शकणार नाही. |
| २४ | ओळखपत्र मिळण्याकरीता अर्ज केला असल्याच्या पावतीच्या आधारे परीक्षेस प्रवेश मिळू शकेल काय? | दोन मूळ ओळखपत्राशिवाय अन्य कोणत्याही कागदपत्रे/पावतीच्या आधारे उमेदवारास परीक्षेस प्रवेश मिळू शकणार नाही. |
| २५ | विकलांग उमेदवारास लेखनिकाची मदत घेण्याची/अनुग्रह कालावधी मिळण्याकरीताची पध्दत काय आहे? | (१) ऑनलाईन पध्दतीने विकलांग असल्याबाबत तसेच लेखनिकाची आवश्यकता असल्याबाबत स्पष्ट दावा केल्यानंतर संबंधित परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत युजर आयडी व आधार क्रमांकासह परीक्षेचे नांव नमूद करुन desk३.mpsc@maharashtra.gov.in किंवा mpscpre@gmail.com या ईमेलवर किंवा आयोगाच्या फोर्ट कार्यालयाच्या पत्त्यावर पत्राद्वारे विनंती अर्ज करता येईल.<br>(२) सविस्तर सूचनांसाठी आयोगाच्या संकेतस्थळावरील 'विकलांग व्यक्ती' या मथळ्याखालील मार्गदर्शक सूचनांचे अवलोकन करावे.<br>(३) सरळसेवा भरतीकरीता चाळणी परीक्षा घेण्याबाबत आयोगाच्या संकेतस्थळावर घोषणा प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत युजर आयडी व आधार क्रमांकासह परीक्षेचे नांव नमूद करुन desk३.mpsc@maharashtra.gov.in किंवा mpscpre@gmail.com या ईमेलवर किंवा आयोगाच्या फोर्ट कार्यालयाच्या पत्त्यावर पत्राद्वारे विनंती अर्ज करता येईल. |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| २६ | आयोगाकडे स्वतंत्रपणे अर्ज केल्याशिवाय केवळ अर्जात केलेल्या दाव्याच्या आधारे लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळू शकेल काय? | विहित कागदपत्रासह अर्ज केल्याशिवाय तसेच आयोगाकडून लेखी परवानगी प्राप्त झाल्याशिवाय लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळू शकणार नाही. |
| २७ | लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याकरीता करावयाच्या विनंती अर्जासोबत कोणकोणती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे? | (१) प्रपत्र-१, प्रपत्र-२ ची छायांकित प्रत, SADM प्रकारातील विकलांगत्व प्रमाणपत्राची छायांकित प्रत, लेखनिकाची आवश्यकता असल्यास लेखनिकाचे आधार कार्ड.<br>(२) विवरणपत्र-३ व/किंवा विवरणपत्र-४ परीक्षेच्या वेळी संबंधित उपकेंद्र प्रमुखाकडे जमा करावे. |
| २८ | विकलांगत्वाचे प्रमाणपत्र SADM प्रकारातील नसल्यास लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधीचा लाभ मिळू शकेल काय? | शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य ६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ नुसार विकलांग उमेदवार असल्याचा पुराव्याकरीता SADM प्रकारातील विकलांगत्व प्रमाणपत्र बंधनकारक आहे. |
| २९ | प्रत्येक परीक्षेकरीता लेखनिक/अनुग्रह कालावधीसाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे काय? | प्रत्येक परीक्षेकरीता विहित कागदपत्रांसह स्वतंत्र विनंती अर्ज करणे आवश्यक आहे. |
| ३० | लेखनिक म्हणून कुणाची मदत घेता येणार नाही? | (१) आयोगाच्या कोणत्याही परीक्षेकरीता उमेदवार असलेली व्यक्ती.<br>(२) आयोगाकडून कोणत्याही पदावरील निवडीकरीता शिफारस करण्यात आलेली व्यक्ती.<br>(३) व्यावसायिक लेखनिक म्हणजेच आर्थिक/कोणत्याही मोबदल्यात लेखनिक म्हणून मदत करणारे खाजगी क्लासचालक, उमेदवार, इत्यादी. |
| ३१ | आयोगामार्फत प्रतीक्षा यादी ठेवली जाते काय? | (१) एकल संवर्ग असलेल्या सर्व परीक्षांची गुणवत्ता यादी हीच प्रतीक्षा यादी असते.<br>(२) आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी नियुक्ती न स्वीकारल्यास अथवा अन्य कोणत्याही कारणासाठी नियुक्ती झाली नसल्यास संबंधित रिक्त पदावर प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची शिफारस करण्याबाबत शासनाकडून विहित कालावधीत विनंती करण्यात आली तरच आयोगाकडून प्रतीक्षा यादीतील उमेदवारांची शिफारस करण्याबाबत विचार करण्यात येतो. |
| ३२ | संभाव्य वेळापत्रकामध्ये नमूद परीक्षेची जाहिरात कधी येईल? शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाले आहे काय? | (१) संभाव्य वेळापत्रक प्रसिध्द केल्यानंतर वेळापत्रकानुसार जाहिरात प्रसिध्द करुन परीक्षा घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो.<br>(२) शासनाकडून मागणीपत्र प्राप्त झाले आहे/नाही; याविषयी प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वेळापत्रकाबाबतची सद्यस्थिती आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते. |
| ३३ | निकाल जाहिर झालेल्या परीक्षेची उत्तरपत्रिका/उत्तरपुस्तिका यांची प्रत कशाप्रकारे मिळू शकते? | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत संबंधित उमेदवाराला उत्तरपत्रिका/उत्तरपुस्तिकांची प्रत उपलब्ध होऊ शकते. |
| ३४ | मागासवर्गीयांकरीता असलेल्या वयोमर्यादेचा लाभ घेतल्यास खुल्या / अराखीव पदावरील निवडीकरीता विचार केला जातो का? | नाही. |
| ३५ | समांतर आरक्षणानुसार आरक्षित पदावर पात्र उमेदवार न मिळाल्यास सदर पदावर कोणाची निवड करण्यात येते? | संबंधित प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येते. |
| ३६ | परीक्षेदरम्यान समवेक्षक अथवा परीक्षेकरीता नियुक्त कोणत्याही कर्मचा-याने एखाद्या उमेदवाराला अनावश्यक सवलत दिली अथवा कोणत्याही प्रकारे त्याच्या कर्तव्यात हलगर्जीपणा वा कसूर केल्यास तक्रार कुणाकडे करावी? | सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५ १/२ वा, ७ वा, ८वा मजला, कुपरेज टेलिफोन एक्सचेंज इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०० ०२१ या पत्त्यावर किंवा sec.mpsc@maharashtra.gov.in या ईमेलवर तक्रार करता येईल. |
| ३७ | कोणताही उमेदवार वा व्यक्ती आयोगाच्या परीक्षेत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार करत असल्याचे निदर्शनास आल्यास तक्रार कुणाकडे करावी? | सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५ १/२ वा ७ वा, ८वा मजला, कुपरेज टेलिफोन एक्सचेंज इमारत, महर्षी कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०० ०२१ या पत्त्यावर किंवा sec.mpsc@maharashtra.gov.in या ईमेलवर तक्रार करता येईल. |